महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसएसएन-१०९३/३७२३/ माशि-१
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
दिनांक : २५ ऑक्टोबर, १९९३

प्रति,
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय :- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

---

भूकंपग्रस्त लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील सुमारे १००० विद्यार्थ्यांचे इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था पुणे येथे करण्याबाबत अध्यक्ष, भारतीय जैन संघटना, यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन "भारतीय जैन संघटना" या संस्थेस पुणे येथे मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळा [कला, वाणिज्य व विज्ञान शाखा] १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास सदर आदेशान्वये खास बाब म्हणून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी विहित अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन संस्थेला नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी/मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१] संस्थेकडून विहित चलन शुल्कासह प्रथम प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात यावा.

२] संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

३] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

४] संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेण्यात आलेली नसावी.

५] संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नसाव्यात अथवा संस्थेने चालविलेली शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत प्रकरण प्रलंबित नसावे.

कृ.मा.प.

३. याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही त्वरित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

[ द. रा. माळी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, :
माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षणाधिकारी, [प्राथ.]व [माध्य.] जिल्हा परिषद, पुणे.
३. अध्यक्ष, अखिल भारतीय जैन संघटना, ११८९/४, शिवाजीनगर, एफ. सी. रोड ज्ञानेश्वर पादुका चौक, पुणे
४. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
७. मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
८. निवड नस्ती.

पशिम२६१०